## संविधानाची जागरुकता प्रत्येकांमध्ये व्हावी - कुलगुरू

अमरावती.

भारतीय संविधानाची जागरुकता प्रत्येक भारतीयांमध्ये निर्माण व्हावी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्रामध्ये संविधान सप्ताह निमित्ताने संविधान उद्देशिका वाचन आणि उद्देशिकेचे महत्व यावर संपन्न झालेल्या कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलगुरू बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, आय.आय. एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, गणित विभाग प्रमुख डॉ. एस.डी. कतोरे व डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. सचिन गायकवाड उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, भारताला १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि १९४९ ला या देशाला घटना मिळाली. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी संविधान समिती गठीत झाली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बाबासाहेबांच्या दूरदृष्टीतून भारत देशाची घटना लिहील्या गेली. संविधानाची आठवण केली की बाबासाहेबांची आठवण राहते, त्यांच पुण्यस्मरण होतं, अस फार कमी देशात घडतं. एका व्यक्तीने घटना लिहीणे हे फार मोठं काम बाबासाहेबांनी केलं आहे. अख्खा देश या कामासाठी बाबासाहेबांना मानतो. संविधान आज आपल्या देशाचा ग्रंथ आहे.

विद्यापीठामध्ये अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात, त्या सर्वांपर्यंत घटनेची माहिती जावी आणि आपली लोकशाही सुदृढ व्हावी, या उद्देशाने संविधान सप्ताह साजरा होत आहे. घटनेतील कर्तव्यांपेक्षा अधिकारांवर लढा केंद्रीत झाल्याची खंत व्यक्त करुन कुलगुरू पुढे म्हणाले, कर्तव्य आणि अधिकार यात संतुलन साधल्या जावं. आपल्या संविधानाचे कौतुक जगामध्ये आहे. बाबासाहेबांचं प्रत्येक क्षेत्रात असलेलं योगदान अतुलनिय आहे, सर्वांनी संविधानाचा अभ्यास करावा असेही ते म्हणाले.

सुरुवातीला मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्ती प्रज्वलन केले. पाहुण्यांचे गुलाबपुष्प देवून डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. सचिन गायकवाड यांनी स्वागत करुन प्रास्ताविक भाषणातून संविधान सप्ताहाचे महत्व विशद केले. संचालन करीत आभार प्रा. पवन तायडे यांनी मानले. कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, एल.एल.ई. चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, शैक्षणिक विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी शहरातील प्रतिष्ठीत नागरिक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## संविधान सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने दि. २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत संविधान सप्ताह निमित्त संविघान वाचन कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन, संविधान गौरव एकपात्री प्रयोग स्पर्धेचे आयोजन, निबंध स्पर्धा/ गीत गायन स्पर्धेचे आयोजन, भारतीय संविधानावर आधारीत प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग यांना पत्राद्वारे कळविण्यात आले असून कार्यक्रम आयोजनाचा अहवाल मागविण्यात आला आहे. तरी संविधान सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन विद्यार्थी विकासचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २६/११/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी